# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 23/01/2021 (शनिवार)
(दुपार)

---

### शासकीय कामकाजात अळथळा निर्माण करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत 05 कि.मी अंतरावर थुंगावदेव शिवार येथे दिनांक 22/01/2021 चे 11.15 वा. ते 11.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– प्रविण प्रकाशराव तरवटकर, वय 37 वर्ष, नोकरी पावर ग्रीड कॉर्पोरेशन इंडिया (भारत सरकार) रा. पॉल्ट नं 22, उन्नती पार्क, मानेवाडा रिंग रोड बेसा जि.नागपूर हा भारत सरकारच्या उपक्रमा अंर्तगत पॉवर ग्रीड कार्पोरेशन ऑफ इंडीया नागपुर मध्ये टेक्निशियन ग्रेड–2 या पदावर नोकरी करीत असुन घटना तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादि हा आपले सहकाऱ्या सोबत टॉवर क्र 464 चे मेंटनन्स चे काम करीत असतांना आरोपी नामे– संजय नामदेवराव मानकर, वय 46 वर्ष, रा. थुंगााव देव, ता.नरखेड, जि.नागपूर हा शेताकडुन शिवीगाळ करीत आला व टॉवरवर चढलेल्या लेबरला दगड मारुन फेकले तसेच फिर्यादिस डाव्या पायाचा घोटयाजवळ लाकडी दांडयाने मारले व शेतात असलेल्या घरामधुन बंदुक आणुन बंदुकीचा धाक दाखविला व ''उडा दुंगा, पेट्रोल डाल के जला दुंगा'' फिर्यादी हे काम बंद करुन निघत असतांनी आरोपीने फिर्यादीची गाडी थांबुन म्हटले की, ''1,00,000/–रु. मिळतील असे लिहुन दया, तरच गाडी जावु देणार व काम करु देणार नाहीतर काम करू देणार नाही'' असे म्हणुन शासकिय कामात अडथळा निर्माण केला व शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपी विरुध्द कलम 353,332,323,504,506 भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर आरोपीला अटक करण्यात आहे. गुन्हयाचा पुढील तपास पो उप..नि सोनवणे मो. न. 7798801816 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर